# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ३०२–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| चेअरमन,<br>कृष्णा लिफ्ट इरिगेशन लि.<br>मु.पो. बोरगांव, ता. वाळवा, जि. सांगली | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इस्लामपूर, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, इस्लामपूर १, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

**कोरम** :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग
(ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## न्याय निर्णय

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

कृष्णा लिफ्ट इरिगेशन लि. मु.पो. बोरगांव न.१, ता. वाळवा, जि. सांगली या संस्थेचे चेअरमन यांनी मंचाकडे दि. २५.१०.२०१० ला परिशिष्ट अ मध्ये गाऱ्हाणे दाखल केले. प्रस्तुतचे अपील अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचे दि. २८.९.२०१० च्या आदेशाविरुध्द दाखल केले आहे. जाबदार नं.३ कनिष्ठ अभियंता, बोरगांव यांनी संस्थेचे वीज कनेक्शन बंद करणेचा प्रयत्न केला आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे ऊस पिकाचे नुकसान झालेस ती नुकसान भरपाई देणेची जबाबदारी वीज मंडळाची राहील. अर्जदाराने माहे जून २०१० अखेर पर्यंतो नियमाप्रमाणे वीज बील भरलेले आहे.

तक्रारीतील पॅरा नं. ६ मधील मंचाकडून अपेक्षित मदत – राज्य सरकारने दि. १२ ऑगस्ट २०१० रोजी कृषी पंपाच्या वीज बिलात जी सवलत शेतकऱ्यांना दिलेली आहे ती रक्कम कमी करणेत यावी, सन मे २००० ते मार्च २०१० अखेर संस्थेस शासनाकडून किती सवलत मिळाली याची माहिती मिळावी, मा. आयोगाच्या नवीन नियमाप्रमाणे होणारी दंडात्मक रक्कम व इतर खर्च संस्थेच्या खाती वर्ग करावा अशी मागणी केली आहे.

तक्रारी सोबत दाखल केलेल्या कागदपत्रांवरुन विशेषत: दि. ७.८.२०१० च्या पत्रानुसार वीज बील दुरुस्तीची तक्रार सहाय्यक अभियंता, इस्लामपूर १ यांचेकडे केल्याचे दिसून येते व प्रति युनिट दर ३० पैंसे या प्रमाणे २६७३ युनिटला लावावा व इतर कोणतेही आकार आकारु नयेत अशी मागणी केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. २९.११.२०१० च्या लेखी अहवालात सदर संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्राची प्रत प्राप्त झाल्यानंतर जून २००५ पासून झालेल्या प्रति ५० पैंसे युनिट प्रमाणे झालेल्या वीज आकारणीपैंकी शासन दराने प्रति युनिट ३० पैंसे या प्रमाणे वीज आकारणी करुन उर्वरित प्रति युनिट २० पैंसे आकारणी कमी करणेचा व शासनाकडे रक्कम वर्ग करणेचा प्रस्ताव सप्टेंबर २०१० अखेर झालेल्या वीज आकारणीची व बिलींग यांची तपासणी करुन वरिष्ठ कार्यालयास मंजुरीसाठी सादर करणेची कार्यवाही केली जाईल असे म्हटले आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. २२.१२.२०१० ला सुनावणीस घेतली असतां, ग्राहक प्रतिनिधींनी तारीख वाढवून घेतली. त्यानंतर दि. १२.१.२०११ ला अर्जदार व वितरण कंपनी यांच्यामध्ये तडजोडनामा झाल्याचे अर्जदार यांनी आपल्या पत्रात उल्लेख केलेला आहे. त्याबाबत वि.प.ने आपल्या दि. ११.१.२०११ च्या पत्रात मुख्य कार्यालयाचे परिपत्रकामध्ये संदिग्धता असलेने ग्राहकास ३० पैंसे दराने आकारणी करावी किंवा काय घ याचे मार्गदर्शन वरीष्ठ कार्यालयाकडून मागविले आहे. त्यांच्या मंजुरीने किंवा मार्गदर्शनानंतर ३० पैंसे प्रमाणे आकारणी केली जाईल. सदर बाब ग्राहकांच्या निदर्शनास आणली असून ग्राहकाचे समाधान झाले असल्याने तक्रार निकाली काढण्यात यावी असे म्हटले आहे. अशाच प्रकारच्या मजकूराचा ग्राहकाचे प्रतिनिधी / चेअरमन, कृष्णा लिफ्ट इरिगेशन यांनी मंचाला केलेल्या अर्जात उल्लेख केल्याचे दिसते. सोसायटीचे प्रतिनिधी यांनी या तडजोडनाम्याच्या छाननी (Verification) करिता पदाधिकारी हजर राहिल्याचे सांगितले. परंतु जवळ जवळ ६ आठवड्यापेक्षा जास्त काळ होऊनसुध्दा सोसायटीचे पदाधिकारी हजर राहिले नाहीत. त्यामुळे वि.प.चे सहाय्यक अभियंता यांनी दि. ११.१.२०११ च्या पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे ग्राहकाचे समाधान झाले आहे असे अनुमान काढता येईल. तक्रार निकाली काढतांना सोसासटीचे चेअरमन यांनी मंचाकडे दाखल केलेला तडजोडनामा व वि.प.चे दि. ११.१.२०११ चे पत्र हे या आदेशाचा भाग समजण्यात येईल.

## आदेश

१) ग्राहकाचे प्रतिनिधी सोसासटीचे चेअरमन यांनी मंचाकडे दाखल केलेला तडजोडनामा व वि.प.चे दि. ११.१.२०११ चे पत्र क्र. ३१० विचारांत घेवून झालेली तडजोड उभयबाजूंना मान्य असल्याचे अनुमान काढून तक्रार निकाली काढणेत येत आहे.

२) खर्चाबाबत आदेश नाही.

३)	या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई यांजकडे करता येईल.

दिनांक :

( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.